

**मी प्रज्ञा संभाजी वरेकर.** माझा जन्म सातारा जिल्ह्यातील कराड या गावी झाला. माझे काका, वडील कबड्डी खेळाडू असल्यामुळे घरात खेळाचे वातावरण होतेच. मी पाचवी मध्ये असताना विठामाता विद्यालय, कराड या शाळेत प्रवेश घेतला तिथे आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल मार्गदर्शक श्री. अजित पाटील सर यांनी माझी व्हॉलीबॉल खेळण्यासाठी निवड केली. तेव्हापासून मला व्हॉलीबॉल या खेळाची आवड निर्माण झाली. इयत्ता पाचवी पासून व्हॉलीबॉल खेळाचा नियमित सराव सुरू झाला. सरावाला सुट्टी असली की घरी करमायचे नाही. सन असले, उन्हाळ्याची सुट्टी असली तरी सराव नियमित सुरू असायचा.

यातूनच 14, 17 वर्षाखालील राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. 17 वर्षाखालील राष्ट्रीय स्पर्धेतून आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी निवड झाल्यानंतर भोपाळ या ठिकाणी आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी भारतीय संघात निवड झाली. थायलंड या ठिकाणी संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. त्यानंतर देखील नियमित सराव सुरु होताच यातूनच 10 वेळा राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी झाले. वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत कांस्य पदक पटकावले. तसेच 4 वेळा अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत सहभाग नोंदवला.

खेळाची आवड असल्यामुळे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे येथून बीपीएड ही पदवी मिळवली. यातून क्रीडा मार्गदर्शक या पदाची परीक्षा देऊन ऑगस्ट 2024मध्ये राज्य क्रीडा मार्गदर्शक(व्हॉलीबॉल) म्हणून क्रीडा खात्यामध्ये कार्यरत आहे.
आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ज्यावेळी मी सहभागी झाले त्यावेळी माझ्या गावातून माझी मिरवणूक काढण्यात आली . यामिरवणुकीत माझ्या सोबतच्या सहकारी , माझे कोच , मी ज्या  शाळेत शिकत हिते त्या शाळेच्या मुख्यध्यापिका , शिक्षक , शिक्षिका , विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते . सर्वांना आपल्या शाळेची विद्यार्थिनी भारतीय संघाच प्रतिनिधित्व करत आहे याचा खूप अभिमान वाटत होता . माझे आई वडील बहीण भाऊ अज्जी सर्वच कुटूंब यांना झालेला आनंद खूपच अतुलनीय होता . असा अतुलनीय आनंद माझ्या प्रियजनांना मिळण्यामागे खेळातील मेहनत , सातत्य , गुरुंचे मार्गदर्शन आणि माझ्या खेळावरील नितांत प्रेम या गोष्टी कारणीभूत आहेत असे मला वाटते . या व्हॉलीबॉल खेळानेच मला एवढी मोठी प्रसिद्धी आणि माझ्या आई वडिलांचे व शाळेचे , माझ्या जिल्ह्याचे आणि राज्याचे नाव लौकिक  करण्याची संधी दिली . या व्हॉलीबॉल खेळणे मला जे जे दिले ते याठिकाणी शब्दातून सांगणे सोपे नाही . या व्हॉलीबॉल खेळाच्या सेवेसाठी मी कायम तत्पर राहील व शासकीय व्हॉलीबॉल कोच या नात्याने मी या खेळाच्या मध्यमातुन खेळाचा प्रचार आणि प्रसार व उत्तम खेळडू तयार करण्याचा प्रयत्न करेल.